# १४. परवाना

## परवाना/ना हरकत प्रमाणपत्र/चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देण्याबाबत

(१) **ध्वनिवर्धक परवाना :** जनतेकडून अथवा संस्था, महामंडळाकडून ध्वनिवर्धक परवान्यासाठी संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडे को-या कागदावर अर्ज सादर करण्यात आल्यावर, त्याबाबत मुंबई पोलीस अधिनियम-कलम १६२ मधील तरतुदीनुसार योग्य त्या अटी, शर्ती व वेळेचे बंधन घालून कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी एक दिवस अगोदर निर्णय घेण्यात येईल.

(२) **खाद्यगृह (हॉटेल) परवाना :** खाद्यगृह परवाना मिळण्यासाठी जनतेकडून ग्रामीण भागामध्ये जिल्हा दंडाधिकारी तर आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज प्राप्त झाल्यावर व त्याने त्यासाठी लागणा-या अटी व शर्तींची पूर्तता केल्यावर, त्यास परवाना देण्याबाबत असा अर्ज केल्यापासून **३० दिवसांच्या आत** निर्णय घेण्यात येईल.

(३) **लॉज परवाना :** वरीलप्रमाणे.

(४) **सार्वजनिक ठिकाणी करमणुकीसाठी जागेचा परवाना :** अर्जदारास एफएल-३ परवाना व आरोग्य खात्याचा परवाना मंजूर होताच अर्जदाराने असा परवाना देण्यासाठी अर्ज केल्यास, अर्ज केल्यानंतर **७ दिवसांत** त्यास सदर परवाना मंजूर करण्यात येईल. मात्र यासाठी अर्जदाराची जागा, अर्जदाराचा चारित्र्य पडताळणी अहवाल अनुकूल असला पाहिजे. हा परवाना देण्यासाठी ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी तर आयुक्तालयात पोलीस आयुक्त हे 'परवाना प्राधिकारी' आहेत.

(५) **कार्यक्रमासाठी तात्पुरत्या स्वरूपाच्या जागेचा परवाना :** अर्जदाराने ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी तर आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात अर्ज केल्यावर व त्याबाबतचा अहवाल स्थानिक पोलिसांकडून प्राप्त झाल्यावर, त्यास तीन दिवसात परवाना मंजूर करण्यात येईल.

(६) **हॉटेल आस्थापनांना मनोरंजनासाठी परवाना :** अर्जदाराने यासाठी ग्रामीण भागात जिल्हादंडाधिकारी तर आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात अर्ज केल्यानंतर व हा परवाना मिळण्यासाठी आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर तसेच आवश्यक अहवाल संबंधितांकडून प्राप्त झाल्यानंतर, अर्जदारास परवाना मंजूर करणे अथवा नाकारण्याबाबत १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल.

(७) **नाट्यगृहे, व्हिडीओ पार्लर, अम्युजमेंट पार्लर इत्यादींना परवाने :** अर्जदाराने यासाठी ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी व आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात अर्ज केल्यावर व त्यासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता केल्यावर, तसेच त्याबाबतचा अहवाल स्थानिक पोलीस ठाणे व वाहतूक शाखेकडून प्राप्त झाल्यानंतर (सदर अहवाल शक्यतो १ महिन्यात पाठविण्यात यावा), त्याबाबत परवाना देण्याबाबतचा आवश्यक तो निर्णय **१० दिवसांत** घेण्यात येईल.

(८) **चित्रपटगृह परवाना :** ‘महाराष्ट्र चित्रपट विनियम, १९६६’ मधील नियम १०० मधील कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर व असा परवाना देण्यास शासनाने परवानगी दिल्यानंतर, संबंधिताला परवाना देण्याबाबत **१५ दिवसांत** निर्णय घेण्यात येईल. असा निर्णय देण्यास ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी तर आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त हे ‘परवाना प्राधिकारी’ आहेत.

(९) **मिरवणूकसाठी परवाना :** अर्जदाराने ग्रामीण भागात संबंधित पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकारी यांच्याकडे तर आयुक्तालयात संबंधित सहायक पोलीस आयुक्तांकडे अर्ज करताच, सदरच्या अर्जावर असा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी **१ दिवस अगोदर** निर्णय घेण्यात येईल.

(१०) **ध्वनिवर्धक ठेकेदार व्यवसायाचा परवाना :** स्थानिक पोलीस ठाणे यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच सदर परवाना देण्यात येतो. अर्ज आल्यावर **एका महिन्याच्या आंत** परवानगी देण्यात येईल. असा परवाना देण्यास ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी तर आयुक्तालयाच्या ठिकाणी सहायक पोलीस आयुक्त यांना प्राधिकार देण्यात आले आहेत.

(११) **सर्कससाठी परवाना :** अर्जदाराने असा अर्ज ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी तर आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्याकडे केल्यावर व आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता केल्यानंतर त्यास **तात्काळ** परवाना देण्यात येईल.

(१२) **जलतरण तलाव, चित्रपटगृहे, नाट्यगृहे यांच्या जागेच्या परवान्याचे नूतनीकरण :** अर्जदाराने या परवान्यासाठी ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी तर आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्याकडे अर्जासह आवश्यक असणा-या कागदपत्रांची पूर्तता केल्यावर व स्थानिक पोलिसांचा अहवाल प्राप्त झाल्यावर **सात दिवसांत** परवाना नूतनीकरण करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

(१३) **शस्त्र परवाना :** शस्त्र परवाना मिळण्यासाठी जनतेने जिल्हाधिकारी/ पोलीस आयुक्त यांच्याकडे विहित नमुन्यात अर्ज करून त्यासंबंधी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यावर, त्यांच्या अर्जाची छाननी करून **३ महिन्यांच्या आंत** निर्णय घेण्यात येईल.

(१४) **चारित्र्य पडताळणी :** शासकीय कार्यालये, निम शासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम इत्यादींमध्ये नेमणूक झालेल्या किंवा नेमणूक होणाऱ्या उमेदवारांची चारित्र्य पडताळणी एक महिन्याच्या आंत करण्यात येईल.

(१५) **कस्टम ड्यूटी एक्झम्शन सर्टिफिकेट :** सदरचे प्रमाणपत्र बृहन्मुंबईतील धर्मादाय संस्थांना, त्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर व पोलीस उपायुक्त विशेष शाखा-१ यांचेकडून अहवाल **१५ दिवसांत** प्राप्त करून घेऊन **एक दिवसात** मंजूर करण्यात येईल.

**(१६) फटाके परवाने :** अर्जदाराने या परवान्यासाठी ग्रामीण भागात जिल्हा दंडाधिकारी तर आयुक्तालयाच्या ठिकाणी पोलीस आयुक्त यांच्याकडे अर्ज करावा. अर्जदाराचा अर्ज व आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर अर्जावर **१५ दिवसांत** निर्णय घेण्यात येईल.

## ना हरकत प्रमाणपत्रे

**(१) विदेशी मद्य विक्री-बाबत हॉटेल आस्थापनेसाठी ना हरकत प्रमाणपत्र :**–स्थानिक पोलीस आणि विशेष शाखा यांचेकडून अहवाल **१५ दिवसांत** प्राप्त करून **३ दिवसांत** जिल्हाधिकारी, राज्य उत्पादन शुल्क यांना ‘ हरकत/ना हरकत ’ प्रमाणपत्र सादर करण्यात येईल.

**(२) गेस्ट हाऊस, मंदिर, मस्जिद, चर्च व इतर धार्मिक स्थळे यांना बांधकाम करण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र :**–अर्ज प्राप्त झाल्यानंतर अपर पोलीस आयुक्त, वाहतूक व स्थानिक पोलिसांकडून अहवाल मागविल्यानंतर **७ दिवसांत** ‘ हरकत/ना हरकत ’ प्रमाणपत्र संबंधितांकडे पाठविण्यात येईल.

**(३) जलतरण तलाव, चित्रपट गृहे, करमणूक केंद्रे यांच्या बांधकामाबाबत ना हरकत प्रमाणपत्र :**--परवान्यासंबंधी नियमानुसार अर्जदारांकडून संबंधित पोलीस ठाण्यात अर्ज स्वीकारले जातात. सदर अर्ज प्राप्तीनंतर त्याबाबत वाहतूक शाखेकडून अहवाल मागविला जातो व त्यानुसार अर्जदार हा, त्याने मागणी केलेला परवाना देण्यास पात्र असेल व त्याने जो परवाना मागितला आहे, तो देण्याचे दृष्टीने तो आवश्यक त्या अटी व शर्तीची पूर्तता करीत असेल, तर अशा अर्जदारास परवाना देण्याच्या दृष्टीने कारवाई केली जाते. नियमानुसार ज्या परवान्याचे बाबतीत पोलीस आयुक्त हे ‘ परवाना अधिकारी ’ आहेत अशा प्रकरणात विहित नमुन्यात पोलीस परवाना दिला जातो व ज्या प्रकरणात पोलीस आयुक्त हे ‘ परवाना प्राधिकरण अधिकारी ’ होत नाहीत अशा प्रकरणांची नियमानुसार पडताळणी करून व पोलीस अहवाल लक्षात घेऊन " ना हरकत दाखला " संबंधित कार्यालयाकडे पाठविला जातो.

सदरबाबतचा अहवाल स्थानिक पोलीस व वाहतूक शाखेकडून प्राप्त होताच **पंधरा दिवसांत** निर्णय घेण्यात येईल.

(४) **पेट्रोलियमकरिता :** अर्जदाराचा अर्ज व आवश्यक कागदपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित अर्जावर **१५ दिवसांत** निर्णय घेण्यात येईल.

वरील परवान्यांसाठी लागणारी माहिती व कागदपत्रांबाबतची तपशीलवार माहिती परिशिष्ट १ व २ मध्ये देण्यात आली आहे.